प्रादेशिक सहसंचालक, लेखा व कोषागारे यांना प्रादेशिक कार्यालय प्रमुख, आहरण व संवितरण अधिकारी व मागणी अधिकारी म्हणून घोषित करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन निर्णय क्र. सेवाप्र २०.०९/प्र.क्र.६२/कोषा (प्रशा-३)
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक ६ मार्च, २००९

वाचा :-
१) शासन निर्णय क्र. डीएटी-११८५/सीआर २६४/८५/प्रशा.१४, दि. १५/११/१९८५
२) शासन निर्णय क्र. संकिर्ण-१०८७/प्र.क्र.१८४/८७/कोष-३, दि. १ जून १९८७.
३) शासन निर्णय क्र. सेवाप्र १२९२/प्र.क्र.११९/१२/कोषा ३-अ, दि. ८ जुलै १९९२.
४) शासन निर्णय क्र. सेवाप्र २०.०८/प्र.क्र.७१/१/कोषा (प्र-३), दिनांक २८/०५/२००८ व समक्रमांकाचे शुध्दीपत्रक दिनांक १८/०८/२००८.

लेखा व कोषागारे विभाग, नाशिक
क्रमांक ६८८
14/8/09
प्रशासन/रोख
लेखा/निरीक्षण

**प्रस्तावना**

उपरोक्त संदर्भाधीन क्र १ ते ३ अन्वये लेखा व कोषागारे संचालनालयाच्या अधिपत्याखालील नवी मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक, अमरावती, नागपूर या प्रादेशिक कार्यालयांतील उपसंचालक, लेखा व कोषागारे यांना त्यांच्या कार्यालयातील कामकाज सुरळीत चालण्यासाठी प्रादेशिक कार्यालय प्रमुख, मागणी अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र. ४ अन्वये लेखा व कोषागारे संचालनालयाचा सुधारीत आकृतीबंध निर्गमित करण्यात आला असून प्रादेशिक उपसंचालक, लेखा व कोषागारे या पदाचो श्रेणीवाढ करुन सदर पद सहसंचालक दर्जाचे करण्यात आलेले आहे. या सहसंचालक, लेखा व कोषागारे यांना, त्यांच्या कार्यालयातील कामकाज सुरळीत चालण्यासाठी, "प्रादेशिक कार्यालय प्रमुख", "नियंत्रक अधिकारी", "आहरण व संवितरण अधिकारी" व "मागणी अधिकारी" म्हणून घोषित करणे ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. यास अनुसरुन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय**

१) सर्व सहा प्रादेशिक उपसंचालक, लेखा व कोषागारे यांच्या पदांचो श्रेणीवाढ करुन सदर पद सहसंचालक, लेखा व कोषागारे दर्जाची करण्यात आल्याने संबंधित सहसंचालक प्रादेशिक सहसंचालक, लेखा व कोषागारे या पदाचा कार्यभार स्विकारतील त्या दिनांकापासून त्यांना त्यांच्या अधिपत्याखालील सर्व जिल्हा कोषागार, उपकोषागारे, भांडार पडताळणी पथक, वेतन पडताळणी पथक, लेखा प्रशिक्षण कार्यालयासाठी "प्रादेशिक कार्यालय प्रमुख", "नियंत्रक अधिकारी", "आहरण व संवितरण अधिकारी" व उपरोक्त प्रादेशिक कार्यालयास आवश्यकतेनुसार लेखन सामुग्री व शासकिय प्रपत्राचा पुरवठा, शासकिय मुद्रण व लेखन सामुग्री या कार्यालयाकडून परस्पर व्हावा म्हणून "मागणी अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

२) सर्व विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे यांना "प्रादेशिक कार्यालय प्रमुख" म्हणून घोषित करण्यात येत असल्याने महाराष्ट्र कोषागार नियम १४५ खालील टीप तथा परिशिष्ट आठ क्र. १ मधील तरतूदी

...अधिकारी त्यांच्या कार्यालयाच्या सर्व प्रकारच्या देयकाबाबत आहरण व संवितरण अधिका-यांची ...र पाडतील. आहरण व संवितरण विषयक कामासंबंधी त्यांना महाराष्ट्र कोषागार नियम १५६ मधील ...या अधिन राहून त्यांचे कार्यालयातील राजपत्रित अधिका-यांस प्राधिकृत करता येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सं.गि.पाटील )
कार्यासन अधिकारी, वित्त विभाग.

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
३) सर्व विभागीय आयुक्त.
४) सर्व जिल्हाधिकारी.
५) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई-२१.
६) सर्व विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे.
७) कक्ष अधिकारी (कार्यासन-१८ (रचना व कार्यपध्दती), कार्यासन १९-अ), सामान्य प्रशासन विभाग.
८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
९) सर्व उपकोषागार अधिकारी.
१०) निवड नस्ती (कोषा प्रशा-३).